महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २६ वे | दिनांक : १४/०१/२०२६ | वार : बुधवार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केली खदखद



**पुणे** : महापालिका निवडणुकीला काही तास शिल्लक असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याविषयी खदखद व्यक्त केली आहे. मी कोणाच्या विरोधात बोलणार नाही, पण अजित दादांनी ते पाळले नाही, असे फडणवीस म्हणाले. तसेच अजित दादांना दिल्लीत आमच्या वरिष्ठ नेत्यांना भेटायला जायचे असेल तर ते जाऊ शकतात. त्यांना विमान सुद्धा देण्याची व्यवस्था मी करेन, तिकीट सुद्धा काढून देईल. जोपर्यंत आमच्या वरिष्ठांना भेटतात तोपर्यंत मी आनंदी असल्याचेही फडणवीस यांनी म्हटले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी शब्द पाळणाऱ्यांपैकी आहे. मी आधीच सांगितले होते की आमची युती होणार नाही. मात्र आम्ही मैत्रीपूर्ण लढत करू. कोणाच्या विरोधात बोलणार नाही, पण अजित दादांनी ते पाळले नाही. अजित पवार माझ्याच वरिष्ठांकडे माझी तक्रार करणार ना. विरोधकांनाही सोबत घेण्याचा प्रयत्न असेल, पुण्यात अजित पवार आमचे विरोधक होते. पुढे ते म्हणाले, हिंदीतील एक म्हण आहे, 'कब बाप मरेगा और कब बैल बटेंगे'. अजून काही झाले नाही, त्यावर इतके बोलणे योग्य नाही. दोन महाननगरपालिकेत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढत आहेत. 27 महानगरपालिकेत विरोधात लढत आहेत. त्याच्यावर इतकी चर्चा का करायची? असा प्रश्न फडणवीस यांनी उपस्थित केला.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, पुण्यनगरी सातत्याने आम्हाला यश देते म्हणून सुरुवात आणि सांगता इथे करतो. पुणे, मुंबई, नाशिक, नागपूरसह सगळ्या महत्त्वाच्या शहरांमध्ये आम्हाला मत देणार अशी लोकांची मानसिकता बनली आहे. त्यामुळे कोणी काही बोलले, काही सांगितले तरी मानसिकता बदलणार नाही, असे फडणवीस म्हणाले.

## संभाजीनगरमध्ये मतदानापूर्वीच 'कॅश फॉर व्होट'चा राडा

**छत्रपती संभाजीनगर** : मध्ये मतदारांना पैसे वाटप करण्यापूर्वी त्यांची यादी व्हायरल झाली आहे. यामुळे बेगमपुरा परिसरात मोठा गोंधळ झालेला आहे. यामध्ये नाव असलेल्या नागरिकाचे घर स्थानिक नागरिकांनी शोधले आहे. नेमके ही यादी कुणी तयार केली याबद्दल काही माहिती कळू शकलेली नाही. या यादीचे बॅनर लावण्यात आले आहेत.

यावर बोलताना स्थानिक महिला म्हणाल्या की, आमच्या मुलांना काही राजकीय पक्षांचे उमेदवार म्हणत आहे की तुमचा कहार समाज काही करु शकत नाही, तुम्हाला विकत घेतलेले आहे. आम्ही कुणाकडूनही पैसे घेतलेले नाही. आम्ही पैसे घेत नाही म्हणूनच आम्ही विरोध करत आहोत. कुणी पैसे घेतले माहिती नाही. आमच्या समाजाच्या लोकांच्या नावाची यादी करण्यात आली आहे, यामध्ये मृतांच्या नावाचा देखील समावेश असल्याचे महिलांनी म्हटले आहे. 10 ते 15 वर्षांपूर्वी निधन झालेल्या लोकांची नावे यामध्ये देण्यात आली आहेत. आम्ही एकही रुपया कुणाचा घेतलेला नाही.

ही यादी कुणाच्या घरी तयार करण्यात आली हे माहिती नाही. काल आमच्या मुलांनी बैठक आयोजित केली आणि त्यावेळी ही गोष्ट आम्हाला समजली. आम्ही कुणालाही मतदान करणार नाही मतदानावर आम्ही बहिष्कार टाकणार आहोत. कारण जर आम्ही नगरसेवकांकडे गेलो तर ते म्हणतील तुम्ही पैसे घेतले तुमचे काम आम्ही का करावे? असा सवाल ते आम्हाला करतील असे म्हणत एका स्थानिक महिलेने आम्ही मतदान न करण्याचा निर्णय घेतल्याचे म्हटले आहे.

प्रभागाची परिस्थिती अतिशय दयनीय

एकूणच, छत्रपती संभाजीनगरच्या प्रभाग क्रमांक 3 मधील नागरिकांची अवस्था अतिशय दयनीय आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस उपाययोजना केल्या जात नसल्याचा आरोप नागरिक करत आहेत. येत्या काळात तरी महापालिकेने या भागातील पाणीपुरवठा, ड्रेनेज, स्वच्छता आणि वाहतूक व्यवस्थेकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.

अशी आहे प्रभागाची रचना

प्रभाग क्रमांक ३ मध्ये बेगमपुरा, पहाडसिंगपुरा, विद्युत कॉलनी, हनुमान टेकडी, साफल्य नगर, पेठे नगर, भावसिंगपुरा भागशः, भीम नगर भागशः, कानिफनाथ कॉलनी, जयसिंगपुरा कुतुबपुरा, पराक्रम कॉलनी भागशः, गणेश कॉलनी भागशः, एन-12, चाऊस कॉलनी, हिमायत बाग यांचा समावेश होतो. या भागात एकूण 43062 लोकवस्ती आहे.

## अजित पवारांच्या सल्लागाराच्या कार्यालयात पोलिसांची धाड

**पुणे** : उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे राजकीय सल्लागार नरेश अरोरा यांच्या 'डिझाईन बॉक्स' या कार्यालयात पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेचे पथक दाखल झाल्याने राजकीय वर्तुळात सुरुवातीला मोठी खळबळ उडाली होती. मात्र ही कोणतीही अधिकृत पोलिस कारवाई नसल्याचे स्पष्टीकरण पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहे. पोलिसांच्या या पथकाकडून कार्यालयातील कागदपत्रांची केवळ प्राथमिक पाहणी केली जात असल्याची माहिती समोर येत असली तरी, नरेश अरोरा यांच्यावर कोणत्याही स्वरूपाची ठोस कारवाई करण्यात आली नसल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केल्याने या प्रकरणाबाबतचा संभ्रम आता दूर झाला आहे.

या प्रकरणावर उपमुख्यमंत्री अजित पवारांनी ट्विट करत माहिती दिली आहे. ते म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी कार्यरत असलेले नरेश अरोड़ा व त्यांची संस्था 'डिझाइनबॉक्स्ड' यांच्या पुणे कार्यालयात आज क्राईम ब्रँचचे काही अधिकारी माहिती घेण्याच्या उद्देशाने उपस्थित झाले होते. संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या प्रक्रियेदरम्यान आवश्यक ती माहिती देण्यात आली असून संपूर्ण सहकार्य करण्यात आले. या प्रक्रियेत कोणतीही आक्षेपार्ह बाब किंवा कोणतीही अनियमितता आढळून आलेली नाही.
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हे स्पष्ट करू इच्छितो की, या संपूर्ण विषयात पक्ष हा नरेश अरोड़ा व त्यांची संस्था 'डिझाइनबॉक्स्ड' यांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कायद्याचा सन्मान करतो आणि सर्व वैधानिक प्रक्रियांना सहकार्य करण्यावर विश्वास ठेवतो. या प्रकरणातही संबंधित यंत्रणांना आवश्यक ते संपूर्ण सहकार्य करण्यात आले आहे.
या विषयावर कोणताही संभ्रम, अफवा किंवा अनावश्यक नैरेटिव्ह पसरवू नये, असे आम्ही आवर्जून सांगू इच्छितो. तथ्यांच्या आधारेच कोणताही निष्कर्ष काढावा, हीच आमची भूमिका आहे. या संपूर्ण विषयावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष संयम, जबाबदारी आणि स्पष्टतेसह आपली भूमिका मांडत असल्याचे पवारांनी म्हटले आहे.

पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी ट्विट करत म्हटले की, नरेश अरोड़ा आणि त्यांची संस्था 'डिझाइनबॉक्स' यांच्या पुणे कार्यालयाबाबत अनावश्यक तर्क-वितर्क पसरवले जात आहेत. वास्तविकता अशी आहे की संबंधित यंत्रणांनी नियमित प्रक्रियेअंतर्गत माहिती घेतली असून पूर्ण सहकार्य करण्यात आले आहे. या प्रक्रियेत कोणतीही आक्षेपार्ह बाब समोर आलेली नाही. या विषयात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नरेश अरोड़ा आणि त्यांच्या संस्थेच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. कायद्यावर आमचा पूर्ण विश्वास असून, निष्कर्ष केवळ तथ्यांच्या आधारेच काढले गेले पाहिजेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १४ जानेवारी २०२६


## "महिला सक्षमीकरणाच्या प्रेरणास्त्रोत म्हणजे राजमाता जिजाऊ" प्रा. डॉ. स्मिता शिंदे




**करमाड :** राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड येथे इतिहास विभाग व अंतर्गत तक्रार समितीच्या वतीने "राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती व युवा दिन" निमित्त सरस्वती भुवन महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर येथील इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ. स्मिता शिंदे यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते याप्रसंगी बोलताना स्त्रियांच्या सबलीकरणासाठी जिजाऊंचे राजकीय ,आर्थिक आणि सामाजिक कार्य स्त्रियांसाठी आणि त्यांच्या भविष्यातील पिढीसाठी ते प्रेरणादायी ठरेल असे विचार त्यांनी व्यक्त केले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या जिजाऊंना आई म्हाळसाई व वडील लखुजीराव जाधव यांच्याकडून लहानपणापासूनच महिला सबलीकरणाचे धडे मिळाले होते. जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कार्यक्रमाच्या अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे यांनी स्वामी विवेकानंद यांचे चरित्र अभ्यासून विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा खरा उद्देश साध्य करावा तसेच महिलांनी जिजाऊ सारखे स्वतःला सक्षम करण्याची आजच्या काळात गरज असल्याचे त्यांनी सांगितले या प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भिंतीपत्रकाचे विमोचन करण्यात आले व युवक महोत्सवातील सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्र संचलन इतिहास विभाग प्रमुख व महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.मनोज देवकर यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय डॉ.योगेश शिंदे यांनी केले व आभार अंतर्गत तक्रार समितीच्या अध्यक्ष,प्रा.डॉ. जयश्री पाटील यांनी मांडले या प्रसंगी प्रा. डॉ. बाळासाहेब लिहिणार ,डॉ.रमेश कचरे ,डॉ.सुखदेव पोटदुखे, डॉ. ललित गोल्डे ,डॉ.नानासाहेब लावंड, डॉ. किशोर काळे, डॉ. इमरान पठाण ,डॉ.सौरभ चव्हाण, डॉ. नितीन मुळे ,डॉ अमित राऊत यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.हरिदास होळकर ,प्रा.लक्ष्मण खरात ,प्रा.प्रशांत माठे, प्रा. तन्मय भावसार, श्री प्रसन्न वैद्य श्री ज्ञानेश्वर जाधव ,श्री शिवकुमार मुक्तापुरे श्री अविनाश साळवे, श्री मधुकर राठोड आदींनी परिश्रम घेतले.

## जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत कु. आकांक्षा चव्हाण हिला उत्तेजनार्थ बक्षीस



**पिशोर :** जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिंपरखेड (पिशोर) येथे राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व युवक महोत्सव 2026 च्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत श्री संत ज्ञानेश्वर विद्या मंदिर, शिवनगर येथील विद्यार्थिनी कु. आकांक्षा दलपत चव्हाण हिने विशेष प्राविण्य मिळवत उत्तेजनार्थ बक्षीस पटकावले.या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विविध विषयांवर आधारित भाषणातून विद्यार्थ्यांनी आपले विचार प्रभावीपणे मांडले. कु. आकांक्षा चव्हाण हिने आपल्या स्पष्ट उच्चार, आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण व आशयपूर्ण मांडणीमुळे परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. तिच्या भाषणातील विचारांची खोली व प्रभावी शैली यामुळे तिला उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले.या यशाबद्दल आयोजित समारंभात उपजिल्हाधिकारी श्री. पदमाकर गायकवाड व संस्थेचे सचिव श्री. सागर जाधव यांच्या हस्ते कु. आकांक्षा चव्हाण हिला रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.या प्रसंगी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थिनीच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष साबुसिंग राठोड, उपाध्यक्ष रामदास सुरडकर, सचिव पांडुरंग राठोड, सहसचिव संजय पुरी, कोषाध्यक्षा सरला सोनवणे, संचालक शिवाजी वाघ, संचालक मुकुंद शिंदे, तसेच मुख्याध्यापक प्रकाश जिरेमाळी यांनी कु. आकांक्षा चव्हाण व तिच्या पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थिनीच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करत तिच्या पुढील शैक्षणिक व स्पर्धात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमधील वक्तृत्व कौशल्य, आत्मविश्वास व विचारमांडणीची क्षमता विकसित होते, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

## आभासी स्टेटस पेक्षा आई-वडिलांचे स्टेटस मोठे-विलास बडे




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :-** काबाडकष्ट करणाऱ्या आई वडील व स्वतःचे स्टेटस ठेवण्याऐवजी युवा पिढी व विद्यार्थी हे आभासी स्टेटस च्या मागे लागल्याने खऱ्या चक्रव्यूहात ही पिढी अडकल्याचे प्रतिपादन पत्रकार तथा व्याख्याते विलास बडे यांनी केले.जिंतूर येथे व्हॉइस ऑफ मीडिया व जिंतूर तालुका प्रेस क्लबच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते व्यासपीठावर ज्येष्ठ पत्रकार नगरकर, नगराध्यक्ष प्रताप देशमुख सुंदरलाल सावजी अर्बन कॉपरेटिव बँकेचे अध्यक्ष मुकुंद सावजी कळमकर, पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे, नायब तहसीलदार प्रशांत राखे, माजी नगराध्यक्ष सचिन गोरे, ज्ञानोपासक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्रीधर भोंबे, तालुका आरोग्य अधिकारी आबासाहेब जाधव, डॉ. दुर्गादास कानडकर, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष रमेश दरगड ,राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष लक्ष्मणराव , विधीज्ञ मनोज सारडा, उद्योजक सचिन तोष्णीवाल ,सुधीरजी शहाणे, बालरोगतज्ञ डॉ.जी जे वाघमारे, नगरसेवक अँड गोपाळ रोकडे ,डॉ. प्रकाश अकोसे, मुख्याध्यापक श्रीधर गीते ,माजी नगराध्यक्ष सखाराम चिद्रवार तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष शकील अहमद , देवेंद्र भुरे, सत्यनारायण शर्मा, कैलास खंदारे ,भीमराव घुले, सुरेश कुटे ,सुदर्शनअच्छा, राजेश देवकर मनोज राजोतिया, दिलीप देशपांडे रत्नदीप कळमकर ,दामोदर बुधवंत ,सुरेश कुटे आदींची उपस्थिती होतीयावेळी पाहुण्यांच्या हस्ते प्रतिनिधी स्वरूपात विनोद पाचपिल्ले ,राजू गारकर प्रशांत मुळी ,प्रभाकर कुरे ,शंकर जाधव यांना 15 लाखाच्या विमा पॉलिसीची वाटप करण्यात आलेयावेळी बोलताना विलास बडे यांनी शेतकऱ्यांना व्यवस्थेने चक्रविवाहात अडकले असून निर्णय प्रशासकीय व्यवस्था ही शेतकऱ्यांना धारातीर्थी पाडण्यास भाग पाडत आहे दुसरीकडे युवा पिढी ही मोबाईलच्या स्टेटस मध्ये बरबाद होत आहे स्वतःचे स्वप्न अर्धवट सोडून आभासी जगात वावरण्याचे काम युवा पिढी करत आहे स्वतःच्या कष्टाच्या घामाचा बाप करीत असलेल्या कामाचा, आई-वडिलांनी केलेल्या काबाडकष्टाचा स्टेटस असताना, आपण मोबाईलवर स्टेटस कशाचे ठेवत आहोत याचे भान युवा पिढीने व विद्यार्थ्यांनी ठेवले पाहिजे असे सांगत त्यांनी या व्याख्यानाच्या माध्यमातून सामाजिक संदेश देत मोबाईलच्या चक्रव्यूहात अडकलेली युवापिढी व व्यवस्थेच्या चक्रव्यूहात अडकलेला शेतकरी हेच खरे अभिमन्यू आहेत त्यांना आता यातून बाहेर काढण्यासाठी व्यवस्थेने प्रयत्न केले पाहिजे असे प्रतिपादित केली. पाहुण्यांचा परिचय प्रा.पांडुरंग निळे, प्रास्ताविक विनोद पाचपिल्ले तर सूत्रसंचालन विजय चोरडिया यांनी केलेकार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिंतूर तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष मंचक देशमुख व्हॉइस ऑफ मीडियाचे अध्यक्ष भागवत चव्हाण, बोरी प्रेस क्लब चे अध्यक्ष आनंद मुरक्या चारठाणा प्रेस क्लबचे अध्यक्ष रघुनाथ गडदे यांनी प्रयत्न केलेचौकटविभागीय पुरस्कार वितरणआजच्या या कार्यक्रमात आचार्य बाळशास्त्री जांभेकर सामाजिक वार्ता पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार अनिल कसबे व आचार्य बाळशास्त्री जांभेकर विकास वार्ता पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार बाबुराव चव्हाण यांना उपस्थित त्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला तर याच कार्यक्रमात नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रताप देशमुख यांचा नागरी सत्कार करण्यात आलाचोकटवारकऱ्यांना वाहिली श्रद्धांजलीतालुक्यामध्ये मुडा येथील ह भ प माऊली दिगंबर कदम महाराज ह भ प प्रसाद राव कदम महाराज ह भ प दत्ता कराळे महाराज यांचे नुकतेच अपघाती निधन झाले होते तालुक्यावर शोककळा पसरलेली असताना कार्यक्रमांमध्ये या तिन्ही महाराजांना सर्व जनसमुदायांनी श्रद्धांजली अर्पण केली

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १३ जानेवारी २०२६


## कन्नडचा भुमीपूत्र ऋषिराज राठोडची नॅशनल क्रिकेट लीग साठी निवड



**कन्नड (अरुण थोरात):** सितानाईकतांडा ता.कन्नड येथील ऋषिराज कृष्णा राठोड ची एनसीएल इंडिया ट्रॉफी साठी निवड झाल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.आजच्या स्पर्धात्मक युगात ग्रामीण भागातील तरुणांनी राष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडणे हे खरोखरच अभिमानास्पद आहे. कन्नड तालुक्यातील होतकरू क्रिकेटपटू ऋषिराज कृष्णा राठोड याने आपल्या मेहनतीच्या आणि सातत्याच्या जोरावर हा मान मिळवून दाखवला आहे. एनसीएल इंडिया ट्रॉफी साठी त्याची निवड झाल्याने संपूर्ण कन्नड तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे.गोवा येथे नुकत्याच पार पडलेल्या नॅशनल क्रिकेट लीग (NCL) च्या निवड शिबिरात देशभरातील गुणवंत खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या कॅम्पमध्ये ऋषिराजने आपल्या दमदार फलंदाजी, अचूक गोलंदाजी आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षणा च्या जोरावर निवड समितीचे लक्ष वेधून घेतले. प्रत्येक सामन्यातील त्याची शिस्तबद्ध खेळी, संघभावना आणि आत्मविश्वास यामुळे त्याचे नाव अंतिम निवडीत कोरले गेले. या निवडीमुळे फेब्रुवारी महिन्यात दिल्ली येथे होणाऱ्या एनसीएल इंडिया ट्रॉफी स्पर्धेत ऋषिराज महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे. ग्रामीण भागातून पुढे येत राष्ट्रीय स्तरावर खेळण्याची संधी मिळणे हे केवळ ऋषिराजसाठीच नव्हे तर संपूर्ण तालुक्यासाठी गौरवास्पद आहे.ऋषिराज मागील तीन वर्षांपासून 22 यार्ड्स स्पोर्ट्स क्लब, कन्नड येथे क्रिकेटचे शिस्तबद्ध प्रशिक्षण घेत आहे. या काळात त्याने कठोर सराव, शारीरिक तंदुरुस्ती, तांत्रिक कौशल्य आणि मानसिक तयारी यावर विशेष भर दिला. त्याच्या या प्रवासात प्रशिक्षक अझहर अली यांचे मार्गदर्शन अत्यंत मोलाचे ठरले आहे. खेळातील बारकावे, शिस्त, जिद्द आणि सकारात्मक दृष्टिकोन हे संस्कार प्रशिक्षकांनी ऋषिराजमध्ये रुजवले.साध्या ग्रामीण पार्श्वभूमीतून आलेला हा तरुण आज राज्य व राष्ट्रीय स्तरावर झेप घेत आहे. त्याचा हा प्रवास अनेक नवोदित खेळाडूंना प्रेरणा देणारा आहे. मेहनत, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्यास कोणतेही ध्येय अशक्य नाही, हे ऋषिराजने आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले आहे.ऋषिराजच्या या यशाबद्दल कुटुंबीय, प्रशिक्षक, मित्रमंडळी, क्रीडाप्रेमी आणि संपूर्ण कन्नड तालुक्याने त्याचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे. आगामी स्पर्धेसाठी त्याला शुभेच्छा देण्यात येत असून, तो देशपातळीवरही आपली छाप पाडेल, असा सर्वांना विश्वास आहे जाणकारांनी व्यक्त केला आहे.

## कन्नड येथे राजमाता जिजाऊ जयंती निमित्त मातांचा गौरव




**कन्नड (अरूण थोरात) :** राजमाता जिजाऊ यांच्या जयंती निमित्त क्रीडा विभाग व एनएसएस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने खेळाडू व स्वयंसेवक विद्यार्थ्यांच्या मातांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. शेखर पाटील, क्रीडा उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हटले की, " आज खेळाचे स्वरूप बदललेले आहे खेळातही करिअर करता येते खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगार नोकरी मिळत आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी खेळावर लक्ष केंद्रित करावे " तसेच मा. गोकुळ तांदळे, क्रीडा अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी म्हटले की," विद्यार्थ्यांनी एक तास मैदानावर घालवला तर तो मोबाईल पासून दूर जाईल" या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय भोसले यांनी म्हटले की," विद्यार्थ्यांना खेळात व महाविद्यालयाच्या विविध उपक्रमात सहभागी होण्यास प्रोत्साहन देतात त्या विद्यार्थ्यांच्या माता त्यामुळे मातांचा सत्कार, गौरव होणे गरजेचे आहे " याप्रसंगी प्रभा पांचाळ, वंदना जगताप, सविता जाधव, सोनाली क्षीरसागर, शिलाबाई पवार, अशा कदम, सुनिता सोनवणे, वर्षा पहाटूळे, वैशाली वारेगावकर, विद्याबाई भोसले, मंगलबाई गंगावणे, अर्चना अकोलकर, आरती वाघ, सोनाली निळ, परविनबी पठाण, सविता राठोड, कल्पना घुगे, स्वाती शिरसे, हिना खान, सुनीता राऊत, सोनाली खंडागळे, मंगल बोंबले, वर्षा शिंदे, अरुणा दाभाडे इ. मांतांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन महाविद्यालयाची क्रीडा प्रमुख डॉ. उदय डोंगरे यांनी केले यावेळी उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, एनएसएस कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रकाश महाजन, डॉ. राकेश अहिरराव, प्रा. अभय आहेर, तालुका क्रीडा संयोजक श्री मुक्तानंद गोस्वामी, श्री राहुल दनके, श्री श्याम खोसरे, श्री शिंदे व विद्यार्थी उपस्थित होते.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students

Government Recognised

Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT

X-RAY | C.T.-SCAN

E.C.G. | Radiology

Physiotherapy | Optometry

O. T. TECHNICIAN

PG Radiology

Contact: 9405109103 8830838903


## राज माता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथे आज राजमाता जिजाऊ जयंती तसेच स्वामी विवेकानंद जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक माननीय श्री. चौधरी सर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्वामी विवेकानंदांचे विचार आणि राजमाता जिजाऊंचे संस्कार विद्यार्थ्यांच्या जीवनासाठी किती महत्त्वाचे आहेत हे प्रभावीपणे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, शिस्त, देशप्रेम आणि परिश्रम या मूल्यांचा अंगीकार करण्याचा संदेश दिला.कार्यक्रमाला विद्यार्थी व शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या प्रेरणादायी कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १४ जानेवारी २०२६



## तिफण कविता महोत्सवातून प्रतिभावंत कवी घडतील - साहित्यिक राजेंद्र दिघे

**कन्नड (अरुण थोरात) :** तिफण कविता महोत्सव म्हणजे खर्या अर्थाने उपेक्षित गाव, खेड्यातील कवित्वाचा सन्मान असून या महोत्सवातून प्रतिभावंत कवी घडतील असे मत जेष्ठ साहित्यिक, कवी, आई प्रतिष्ठान चे संस्थापक राजेंद्र दिघे यांनी व्यक्त केले आहे. ते दि. 11 जानेवारी रोजी कन्नड येथे आयोजित ८व्या राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सव प्रसंगी बोलत होते.या महोत्सवाचे आयोजन भाषा साहित्य संस्कृती संशोधन परिषद, तै.मा.तिफण, सहकार महर्षी बाळासाहेब पवार सा. वाचनालय कन्नड यांच्या वतीने करण्यात आले होते. या तिफण कविता महोत्सवात राज्यभरातील आलेल्या कवी, साहित्यिकांनी हजेरी लावत भरभरुन प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध कवी, गीतकार, साहित्यिक नारायण सुमंत, तर उदघाटक म्हणून कवी राजेंद्र दिघे यांची प्रमुख उपस्थिती होती.पुढे आपल्या उद्घाटनपर भाषणात राजेंद्र दिघे म्हणाले की,तिफण कविता महोत्सव म्हणजे उपेक्षित, दुर्लक्षित गावखेड्यातल्या कवींना व्यासपीठ मिळवून देणारा आणि कवी आणि कवित्वाचा सन्मान करणारा महोत्सव आहे. या महोत्सवा मुळे कन्नड चे नाव महाराष्ट्राच्या नकाशावर कोरल्या गेल्याचे गौरोद्गार त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमांची सुरुवात ग्रंथ दिंडीने करण्यात आली. यात टाळमृदुंगा च्या तालावर मान्यवर सहभागी झाले. अतिथी राजेंद्र दिघे, प्राचार्य डॉ. विजय भोसले, जेष्ठ विधिज्ञ कृष्णा पाटील जाधव, डॉ. अंबादास सगट, प्रा. रंगनाथ लहाने, सुनिल डोके, प्राचार्य राहूल क्षीरसागर, प्र.तहसीलदार दिलीप सोनवणे, डॉ. मिलींद पाटील, संयोजक डॉ. शिवाजी हूसे, रामकृष्ण पवार आदींच्या हस्ते दीपप्रज्वलन करुण सुरुवात झाली. तिफण लोकवाद्य विशेषांक, राष्ठाचा गौरव भिल्ल समाज( अंबादास सगट), पारख झाल गाव(ज्ञानेश्वर गायके), उत्क्रांती ची गोष्ट (समाधान निकम), बाप रगत पेरतो(नारायण कुटे), ठोका काळजाचा(लक्ष्मण वाल्डे), घामाने भिजलेली माती), आदि पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल गितांजली गजबे यांचा सत्कार करण्यात आला. ज्ञानेश्वर गायके, छाया वाघ, संपतराव केरे यांच्या साहित्यकृतींना राज्यस्तरीय तिफण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेचयानिमीत्त कविता चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. यात प्रसिद्ध चित्रकार गिरीश सरनाईक, बी.एस.सोननीस, मनोज चौधरी, विजय बोर्से यांनी आपल्या कुंचल्यातून कवितांचे सुबक रेखाटने केलीत. यानंतर बहारदार कवी संमेलनात राज्यभतून आलेल्या कवींनी आपल्या साहित्य कृतीचे सादरीकरण केले. कार्यक्रमातील सुत्रसंचालन अनिता राठोड, संदिप ढाकणे, प्रविण दाभाडे यांनी केले. याप्रसंगी जेष्ठ साहित्यि क डॉ. संजय गायकवाड, रायभान जाधव, नाना लहाने आदींची उपस्थिती होती.

## राज्यात १२ जिल्ह्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका जाहीर

**मुंबई :** राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांची घोषणा झाली आहे. राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज मंगळवारी जिल्हापरिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीची घोषणा केली.मुंबईतील मलबार हिल येथील सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यामुळे राज्याती १२ जिल्ह्यात निवडणुकीचा धुरळा उडणार आहे.राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत जिल्हा परिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीविषयी माहिती दिली. निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे म्हणाले, 'सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयनुसार ज्या ५० टक्क्यांपेक्षा कमी आरक्षण आहे. अशा जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार १२ जिल्हापरिषद आणि १२५ पंचायत समितीच्या निवडणुका घेण्यात येणार आहे. रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशीव, लातूर या ठिकाणी निवडणुका होतील.मतदाराला दोन मते देता येणारप्रत्येक मतदाराला दोन मते देता येतील. १ मत जिल्हा परिषद आणि १ मत पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी देता येईल. नामनिर्देशन प्रक्रिया ही ऑफलाइन प्रक्रिया राहणार असून महापालिका सारखीच होणार आहे. ज्या जागा राखीव आहेत. त्या जागेवर जातवैधता पडताळणी आवश्यक असणार आहे.जात-प्रमाणपत्र- उमेदवारी अर्जासोबत दाखल करण्याची आवश्यकता असणार आहे. जात-प्रमाणपत्र नसेल तर जात-पडताळणी समितीकडे अर्ज दाखल केल्याची सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे. निवडून आल्यावर ६ महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक असणार आहे. जर नाही केलं, तर त्याची निवड रद्द होईल.निवडणूक वेळापत्रक ■ नामनिर्देशन - पत्र स्वीकारणे - १६ जानेवारी २६ ते २१ जानेवारी २६ ■ छाननी - २२ जानेवारी ■ उमेदवारी माघारी अंतिम मुदत - २७ जानेवारी ■ अंतिम उमेदवार यादी - निवडणूक चिन्ह वाटप - २७ जानेवारी दुपारी साडेतीन नंतर ■ मतदान - ५ फेब्रुवारी ■ मतमोजणी - ७ फेब्रुवारी सकाळी १० पासून

## कवी लक्ष्मण वाल्डे यांच्या ठोका काळजाचा या कवितासंग्रहासाचे 'तिफण राज्यस्तरीय' कविता महोत्सवात प्रकाशन संपन्न




**कन्नड :** भाषा साहित्य कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक तिफण कविसंमेलनात ' ठोका काळजाचा ' या प्रेम कविता संग्रहाचे मराठीतील प्रसिद्ध कवी-लेखक-गीतकार-पटकथाकार -संवाद लेखकनारायण सुमंत यांच्या शुभहस्ते, लोकनेते सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात राज्यस्तरीय कविता महोत्सवात करण्यात आला.डॉ. शिवाजी हुसे, संयोजक,भाषा साहित्य कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक तिफण यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कवी लक्ष्मण गं. वाल्डे यांच्या आगामी मराठी साहित्याचे स्वागत करुन पुढील साहित्यिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. व्यासपीठावर प्रसिद्ध कवी श्री राजेंद्र दिघे, प्राचार्य डॉ विजय भोसले, ॲड कृष्णा पाटील जाधव, डॉ अंबादास सगट, प्राचार्य डॉ राहुल क्षीरसागर, महोत्सवाचे स्वागताध्यक्ष श्री रामकृष्ण पवार, श्री दिलीपकुमार सोनवणे (नायब तहसीलदार, कन्नड) व संयोजक तिफणकार प्रा. डॉ. शिवाजी हुसे सर होते. डॉ. संजय गायकवाड,माधुरी चौधरी, ज्योती,सोनवणे,अरुण थोरात, प्रवीण दाभाडे , ज्ञानेश्वर गायके ,सुरेश औटे,संदीप वाकडे ,केशरचंद राठोड ,संदीप ढाकणे,रामेश्वर मोरे, जगन्नाथ जाधव , दत्ता मोरस्कर,मनोज खुटे यांनी कवी लक्ष्मण वाल्डे यांचे अभिनंदन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अनिता राठोड यांनी केले तर आभार तालुका अध्यक्ष कविवर्य प्रवीण दाभाडे यांनी मानले.

## कन्नड येथे साकारत आहे कवितेचे ग्रंथालय...!

**कन्नड (प्रतिनिधी)** कन्नड तालुक्याला समृद्ध व वैभवसंपन्न ऐतिहासिक, नैसर्गिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक वारसा लाभला आहे. कन्नड तालुक्यात साहित्यिक चळवळ अधिकाधिक गतिमान होऊन सातत्याने विविध वाङ्मयीन, सांस्कृतिक उपक्रम संपन्न होत आहे. तिफण कविता महोत्सवाच्या माध्यमातून अनेक नवोदित कवी लेखन करित आहेत. कन्नड हे कवितेचे गाव म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. कन्नड येथे शिवाजी महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या पुढाकाराने प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली कवितेचे ग्रंथालय साकारत असून या ग्रंथालयाचा उपयोग कवितेचे अभ्यासक, विद्यार्थी, वाचक, संशोधक आणि काव्यप्रेमी नागरिकांना व्हावा, कवितेचे एक संदर्भ ग्रंथालय म्हणून त्याचा उपयोग व्हावा , या महत्वपूर्ण उद्देशाने हे आगळे वेगळे ग्रंथालय सरकारत आहे. या कवितेच्या ग्रंथालयात महाराष्ट्रातील व महाराष्ट्रा बाहेरील नवोदित व मान्यवर कविंचे कवितासंग्रह ठेवण्यात येणार आहे. ग्रंथानुदानातून हे ग्रंथालय साकारत असून कविंनी आपले स्वलिखित किंवा आपणाकडे संकलित असलेले कवितासंग्रह भेट स्वरूपात प्रा. डॉ. शिवाजी हुसे, प्रमुख, मराठी विभाग व संशोधन केंद्र , शिवाजी महाविद्यालय, कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर - ४३१ ११०३ या पत्यावर पाठवावे, असे आवाहन समन्वयक डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १३ जानेवारी २०२६

## उजेडवाटा

हे लाटांनो..
करू नका आदळआपट
उगाचच.. पाहून मला
मी सोडलं नाही अजून
जहाज किनाऱ्यावर
त्सुनामीला घाबरून
आयुष्याच्या महासागरात
किती ही उलथापालथ झाली तरी..

हे ओढ्या नाल्यांनो
खूप झालीय खळखळ
अन् चढाओढ
तुमच्या गढूळ पाण्याची..

नदीला माय मानतोय आम्ही
धरतीचे लेकरं असल्याने
म्हणून देतोय किंमत तुम्हाला
लायकी नसताना तुमची..

अरे..
घुबडासारखे काळोखात
नका मिरवून घेऊ
तुमचं राज्य सुरू झालं
या आविर्भावात
सूर्य मावळला म्हणून..

आमच्या बाप दादयांनी
अंधाराच्या छातीवर
पाय ठेवून
निर्माण केल्याय
आमच्यासाठी उजेडवाटा
अखखं आयुष्य जळून..

म्हणून ...
उजेडाचे दूत होऊन
लढत राहू आम्ही
सूर्य उगवेपर्यंत..



**कवी ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड

## मकरसंक्रांत

तिळ-गुळ घेवूनी
मकरसंक्रांत आली
हिरवी वसुंधरा
चैतन्यात न्हाली

नवे संकल्प
घेवूया हाती
स्नेहाने जपूया
मायेची नाती

उंच आकाशी
उडवूया पतंग
खेळतांना होवूया
आपण सारी दंग

कायम विसरूया
मनातील कडवटपणा
गोड गोड बोलूया
एक दुसऱ्याशी पुन्हा

नको आता भांडण
नको आता खोडी
मनी बाळगूया
तिळ गुळाची गोडी



**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

## नामांतर आंदोलनाचा इतिहास पुस्तक रूपात; माहिती पाठवण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेच्या वतीने नामांतर आंदोलना चे पुस्तक प्रकाशित करण्यात येणार आहे. नामांतर आंदोलनामध्ये अनेक व्यक्तींनी आपले योगदान दिलेले आहे या कार्याची पुस्तक स्वरूपात मांडणी व्हावी या उद्देशाने साहित्य परिषदेच्या वतीने सर्व नामांतर आंदोलनातील सहभागी व्यक्तीची माहिती संकलित करण्यात येणार असून या सर्व माहितीचे पुस्तक स्वरूपात खंड काढण्यात येणार आहे तरी सर्व नामांतर आंदोलनातील सहभागी व्यक्तींना व जाणकार व्यक्तींना माहिती पाठवण्याचे आव्हान परिषदेच्या वतीने डॉ. मोहन सौंदर्य यांनी केले आहे.

मेल.drbaspaurangabad@gmail.com

व्हाट्स नं. 9420761654, 9823208074, 9421245309, 9421678635, 9420400722.

पत्ता. डॉ. मोहन सौंदर्य संवाद,प्लॉट. नं. 52 कमलनगर हौसिंग सोसायटी, पेठेनगर, भावसिंगपुरा छ. संभाजीनगर.

## जिल्हा परिषद बहिरगावच्या मुलींची चित्रे झळकली महाराष्ट्र शासनाच्या दिनदर्शिकेवर!




**कन्नड (प्रतिनिधी) :** तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशाला बहिरगाव येथील विद्यार्थिनींनी आपल्या कलागुणांच्या जोरावर राज्यस्तरावर शाळेचा आणि गावाचा नावलौकिक मिळवला आहे. महाराष्ट्र शासन ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), पुणे यांच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या २०२६ च्या अधिकृत दिनदर्शिकेवर (कॅलेंडर) या शाळेतील विद्यार्थिनींनी रेखाटलेल्या चित्रांची निवड करण्यात आली आहे.'ऊर्जा संवर्धन' या सामाजिक महत्त्वाच्या विषयावर या विद्यार्थिनींनी अतिशय कल्पक आणि अर्थपूर्ण चित्रे रेखाटली होती. विभागीय स्तरावर विशेष प्राविण्य मिळवल्यानंतर, राज्य स्तरावर देखील त्यांच्या चित्रांची निवड झाली. राज्यभरातील निवडक उत्कृष्ट चित्रांमध्ये बहिरगावच्या विद्या रमेश बनकर, तेजश्री अमोल रावते आणि कीर्ती सुनील जाधव या विद्यार्थिनींच्या चित्रांचा समावेश झाला असून ही चित्रे आता शासनाच्या कॅलेंडरवर छापण्यात आली आहेत.या यशासाठी विद्यार्थिनींना शाळेचे कला शिक्षक श्री. सलीम आत्तार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी अभूतपूर्व यशाबद्दल शाळेत एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका नुतन पवार यांच्या हस्ते विद्यार्थिनींचा आणि मार्गदर्शक शिक्षकांचा गौरव करण्यात आला.याप्रसंगी शाळेतील शिक्षक दिलीप महाजन, कुलभूषण व्यवहारे, राजेंद्र शिंपी, नूतन पवार, श्याम खोसरे, श्रीमती किरण पाटील , राधेश्याम शर्मा, स्वप्निल गांगुर्डे, गणेश बल्लाळ, रवींद्र ठाकरे, किसना बाई गोरे, सविता कुंटे उपस्थित होते. जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थिनींनी मिळवलेल्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे

## आंबेडकरी जलसा' कलाप्रकारात मिलिंद कला महाविद्यालयाचा संघ द्वितीय



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आयोजित पहिल्या लोककला महोत्सवात काल दि.12/01/2026 रोजी सादर केलेल्या ' आंबेडकरी जलसा ' या कलाप्रकारातील स्पर्धेत मिलिंद कला महाविद्यालयाच्या संघाने सादर केलेल्या 'आंबेडकरी जलसा' या कलाप्रकारास व्दितीय क्रमांक मिळाला आहे.. या स्पर्धेत विद्यापीठातील अनेक महाविद्यालयांनी आपला सहभाग नोंदविला होता.या संघात प्रमोद निकाळजे, विशाल वाकळे, सुरज अंभोरे,रक्षा सरकटे,रमा वाघमारे, सुरज वाघमारे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी संघप्रमुख डॉ. शिवाजी डोळसे, डॉ.संगिता दोंदे व डॉ.मिलिंद वाव्हळे यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.वैशाली प्रधान यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत मिलिंद महाविद्यालयाच्या यशाची गौरवशाली परंपरा अशीच कायम ठेवा असे प्रतिपादन केले. या यशाबद्दल महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी ही संघाचे अभिनंदन केले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १३ जानेवारी २०२६

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार आणि सामाजिक क्रांतीचा इतिहास

१४ जानेवारी हा दिवस महाराष्ट्रातील मराठवाडा विभागाच्या सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक इतिहासात केवळ एक तारीख नसून तो स्वाभिमान, संघर्ष आणि समतेच्या मूल्यांचा विजय साजरा करणारा क्षण आहे. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील मराठवाडा विद्यापीठाला ‘’ हे नाव देण्यात आलेला हा दिवस म्हणजे वंचित, शोषित आणि दुर्लक्षित समाजघटकांच्या दीर्घ लढ्याचे फलित आहे. हा नामविस्तार केवळ एका संस्थेला दिलेले नाव नसून तो भारतीय लोकशाहीतील सामाजिक न्यायाच्या मूल्यांना शैक्षणिक क्षेत्रात मिळालेली औपचारिक मान्यता आहे. मराठवाड्यासारख्या ऐतिहासिकदृष्ट्या मागासलेल्या प्रदेशात बाबासाहेबांचे नाव असलेले विद्यापीठ असणे म्हणजे येथील लाखो लोकांच्या आशा, आकांक्षा आणि आत्मसन्मानाला एक बौद्धिक अधिष्ठान मिळणे होय.मराठवाडा हा प्रदेश दीर्घकाळ सामाजिक आणि शैक्षणिक उपेक्षेचा बळी ठरलेला आहे. निजामशाहीच्या काळात येथील समाजरचना कठोर जातीय आणि वर्गीय भेदांवर आधारित होती. शिक्षण ही काही विशिष्ट गटांची मक्तेदारी बनली होती, तर बहुसंख्य लोकांसाठी अज्ञान आणि दारिद्र्य हेच नशीब ठरले होते. स्वातंत्र्यानंतरही या प्रदेशाला औद्योगिक विकास, पायाभूत सुविधा आणि उच्च शिक्षणाच्या संधी मिळण्यात मोठा विलंब झाला. त्यामुळे मराठवाड्याच्या तरुण पिढ्यांना केवळ रोजगारासाठीच नव्हे तर आत्मसन्मानासाठीही संघर्ष करावा लागला. अशा परिस्थितीत १९५८ मध्ये स्थापन झालेले मराठवाडा विद्यापीठ हे या प्रदेशासाठी आशेचे केंद्र ठरले, परंतु त्याची सामाजिक दिशा आणि वैचारिक अधिष्ठान याबाबतचा प्रश्न कायम होता.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन मानले. त्यांच्या मते, शिक्षण हे माणसाला केवळ नोकरी मिळवून देत नाही तर त्याला स्वतःची ओळख, अधिकारांची जाणीव आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची शक्ती देते. बाबासाहेबांचे संपूर्ण जीवन हे शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक गुलामगिरी तोडण्याच्या संघर्षाचे प्रतीक होते. त्यामुळे मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने संबोधणे म्हणजे या संस्थेच्या आत्म्याला समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेची दिशा देणे होते. ही मागणी म्हणूनच केवळ प्रतीकात्मक नव्हती, तर ती खोलवर सामाजिक अर्थ असलेली होती.नामांतरासाठी उभा राहिलेला लढा हा मराठवाड्याच्या इतिहासातील एक महत्त्वाचे सामाजिक आंदोलन ठरला. या आंदोलनात विद्यार्थ्यांपासून सामान्य नागरिकांपर्यंत अनेक घटक सहभागी झाले. हा संघर्ष केवळ एका नावासाठी नव्हता, तर तो या प्रश्नासाठी होता की शैक्षणिक संस्था कोणत्या मूल्यांवर उभी राहणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव स्वीकारणे म्हणजे जातीय अहंकार, सांस्कृतिक वर्चस्व आणि ऐतिहासिक अन्यायाला वैचारिक आव्हान देणे होते. त्यामुळे या मागणीला तीव्र विरोधही झाला, परंतु तो विरोधच या मागणीची सामाजिक गरज अधोरेखित करणारा ठरला. अखेर १४ जानेवारी १९९४ रोजी हा ऐतिहासिक निर्णय जाहीर झाला आणि मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर होण्याऐवजी नामविस्तार होऊन विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मिळाले.हा दिवस मराठवाड्याच्या वंचित समाजासाठी केवळ आनंदाचा नव्हे, तर इतिहासाशी न्याय झाल्याचा दिवस होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव या विद्यापीठाला मिळणे म्हणजे भारतीय संविधानातील समतेच्या तत्त्वांची शैक्षणिक क्षेत्रात झालेली प्रत्यक्ष अंमलबजावणी होती. या नामविस्तारामुळे ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची ओळख बदलली आणि त्याचबरोबर त्याची सामाजिक भूमिका अधिक ठळक झाली. हे ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ’ केवळ पदव्या देणारी संस्था न राहता सामाजिक जाणीव घडविणारे आणि विवेक जागविणारे केंद्र बनले.नामविस्तारानंतर ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांमध्ये, संशोधनाच्या विषयांमध्ये आणि शैक्षणिक वातावरणात सामाजिक प्रश्नांना अधिक महत्त्व मिळू लागले. जातीय विषमता, ग्रामीण दारिद्र्य, महिला प्रश्न, आदिवासी समाजाचे प्रश्न, स्थलांतर, बेरोजगारी आणि विकासातील असमानता यांसारख्या विषयांवर येथे सखोल अभ्यास सुरू झाला. मराठवाड्याच्या वास्तवाशी जोडलेले ज्ञान येथे निर्माण होऊ लागले आणि त्यामुळे ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ’ हे केवळ स्थानिक नव्हे तर राज्य आणि देशपातळीवरील बौद्धिक चर्चांमध्येही महत्त्वाचे स्थान मिळवू लागले.या ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून शिक्षण घेणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांनी केवळ स्वतःचे आयुष्यच बदलले नाही तर आपल्या कुटुंबांचे आणि गावांचे भविष्यही बदलले. शेतकरी, कामगार, दलित, आदिवासी आणि ग्रामीण कुटुंबातील मुले-मुली उच्च शिक्षण घेऊन प्रशासकीय सेवा, शिक्षण क्षेत्र, संशोधन आणि सामाजिक कार्यात पुढे आले. ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचे विद्यापीठ असल्यामुळे त्यांना आत्मसन्मानाची आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव अधिक तीव्रतेने होते. त्यामुळे ते केवळ यशस्वी व्यावसायिक नव्हे तर सामाजिकदृष्ट्या सजग नागरिकही बनतात.मराठवाड्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा खोल परिणाम झाला आहे. विविध विभागांमार्फत आयोजित होणारे परिसंवाद, चर्चासत्रे, साहित्यिक उपक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांमुळे विवेकवादी आणि समतावादी विचारांचा प्रसार झाला. अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि स्त्रीदास्य यांविरुद्ध बौद्धिक वातावरण निर्माण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर आधारित संशोधन आणि साहित्यनिर्मितीमुळे विद्यार्थ्यांना सामाजिक वास्तवाची अधिक सखोल जाणीव झाली. विद्यापीठ हे केवळ शिकवण्याचे नव्हे तर समाजाला प्रश्न विचारण्याचे केंद्र बनले.आजच्या जागतिकीकरणाच्या काळात शिक्षणावर बाजारपेठेचा प्रभाव वाढत आहे. शिक्षण म्हणजे केवळ रोजगार मिळवण्याचे साधन अशी धारणा बळावत आहे. अशा वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने आपल्या सामाजिक बांधिलकीची आठवण ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला लोकशाही मजबूत करणारे, विवेक जागवणारे आणि समाजाला अधिक समतावादी बनवणारे साधन मानले होते. त्यामुळे तंत्रज्ञान, नव्या अभ्यासक्रमांची रचना आणि संशोधनातील नवकल्पना यांसोबतच मानवी मूल्यांचे अधिष्ठानही तितकेच महत्त्वाचे असले पाहिजे.मराठवाड्याच्या वास्तवाशी घट्ट नाते ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने भविष्यातील वाटचाल करणे गरजेचे आहे. दुष्काळ, पाणीटंचाई, शेतकरी आत्महत्या, ग्रामीण बेरोजगारी, महिला सक्षमीकरण आणि आदिवासी विकास यांसारख्या प्रश्नांवर येथे अधिक सखोल आणि उपयुक्त संशोधन झाले पाहिजे. या संशोधनाचा उपयोग धोरणनिर्मिती आणि स्थानिक विकासासाठी झाला तरच विद्यापीठाचे ज्ञान समाजाच्या जीवनात प्रत्यक्ष उतरू शकेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाशी जोडले होते, त्यामुळे या विद्यापीठाची प्रत्येक शैक्षणिक कृती समाजाभिमुख असणे आवश्यक आहे.१४ जानेवारी हा दिवस म्हणून आपल्याला केवळ भूतकाळातील एका निर्णयाची आठवण करून देत नाही तर तो आपल्याला आज आणि उद्याची जबाबदारीही सांगतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव धारण करणाऱ्या विद्यापीठाने जात, वर्ग, लिंग आणि धर्म यांच्या पलीकडे जाऊन सर्वांना समान संधी देणारी संस्था बनणे हीच या दिवसाची खरी प्रेरणा आहे. विद्यार्थ्यांना केवळ नोकरीयोग्य नव्हे तर सामाजिकदृष्ट्या जागरूक, लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवणारे आणि मानवी प्रतिष्ठेची जाणीव असलेले नागरिक घडवणे हेच या विद्यापीठाचे खरे ध्येय असले पाहिजे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हा मराठवाड्याच्या वंचित समाजाच्या आशेचा दीपस्तंभ आहे. या विद्यापीठाच्या माध्यमातून हजारो युवक-युवतींना ज्ञान, आत्मविश्वास आणि सामाजिक जाणीव मिळाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव या संस्थेला केवळ ओळख देत नाही तर ती एक मूल्यव्यवस्था देते. समता, न्याय, विवेक आणि मानवता या मूल्यांच्या आधारे ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ जितके अधिक मजबूत होईल तितक्याच वेगाने मराठवाडा सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध होईल. म्हणूनच १४ जानेवारी हा दिवस साजरा करताना आपण केवळ स्मरणोत्सव न करता बाबासाहेबांच्या विचारांनुसार समाज परिवर्तनासाठी नव्याने संकल्प करूया, कारण खरा नामविस्तार हा केवळ कागदावर नसून समाजाच्या जीवनात घडत असतो.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी
विद्यार्थी असून समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),
ईमेल - bagate.rajendra5@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002